नि.दि. दावा क्र. ८२/२०१७
छत्रपती काथोड पाटील
वि. पार्वतीबाई शंकर जोशी व इतर

## नि. ७६ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. २१/११/२०२३ रोजी दाखल करून दाव्यामध्ये दि. ०२/०९/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ३ चे विरूध्द झालेला दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश रद्द करून मागितला आहे. सदर आदेशाची माहिती त्यांना त्यांचे नेमले वकिल ॲड. श्री. पितळे यांच्याकडून समजल्यानंतर त्यांनी १३३२ दिवसांचा विलंब माफ करून मिळणेकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांनी नि. ७८ कडे पुरसिस दाखल करून त्यांनी यापुर्वी नि. ६४ कडे जे म्हणणे सादर केले आहे तेच म्हणणे सदर अर्जाकरीता वाचण्याची विनंती केली आहे. नि. ६४ मधील कथनानुसार प्रतिवादीने पुरेशी संधी मिळूनही नि. १७ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरली नाही. जवळपास १ वर्षाहुन अधिक काळ प्रतिवादीने न्यायालयीन आदेशाचे पालन केलेले नाही व पुन्हा ४ ते ५ वर्षांनी कल्याण येथील स्पे. मु. नं. ३६६/२०१९ चे कामी बाधा निर्माण होईल या भितीने प्रतिवादीने पुन्हा प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमुद केलेले कारण खोटे असून प्रतिवादीने स्वत: हुन अर्ज दाखल करण्यास दिरंगाई केलेली आहे. विलंब माफ करण्याचे कोणतेही ठोस कारण अर्जात नमुद नाही. जाणून बुजून केलेल्या विलंबाकरीता अर्ज नामंजुर करणेच योग्य होईल असे वादीने कथन केले आहे.

३. अर्ज वाचला. म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांना ऐकले. नि. १७ वरील आदेश पाहिला.

४. नि. ७४ कडील आदेशान्वये प्रतिवादीचा १३३२ दिवसांचा विलंब न्यायालयाने रक्कम रू. ५०००/- च्या खर्चावर माफ केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीने सदर

नि.दि. दावा क्र. ८२/२०१७
छत्रपती काथोड पाटील
वि. पार्वतीबाई शंकर जोशी व इतर

खर्चाची रक्कम न्यायालयीन आदेशान्वये जमा केल्यानंतर त्यांच्या विरूध्द झालेला विनाकैफियतचा आदेश न्यायाच्या हेतुस्व रद्द बातल होणे गरजेचे आहे. अन्यथा प्रतिवादीला त्याची बाजु मांडण्याची न्याय संधी भेटणार नाही व त्यामुळे त्याच्याच कायदेशीर हक्कांचे नुकसान होवू शकते. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**:- आदेश -:**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज हा खालील अटींवर मंजुर करण्यात येतो. |
| **अ.** | प्रतिवादीने नि.७४ वरील संपुर्ण खर्चाची रक्कम तसेच नि.१७ वरील खर्चाची रक्कम आदेशात नमुद कालावधीत जमा केल्या नंतरच त्यांच्या विरूध्द पारित झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द होईल. अन्यथा इतर परिस्थीत दावा प्रतिवादींच्या कैफियतीशिवाय चालविण्यात येईल. |
| **ब.** | नि. ७४ वर प्रतिवादीस खर्च लावला असल्याने या अर्जाच्या खर्चाबाबत अन्य आदेश नाहीत. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.04.27 17:22:54 +0530

दि. २७.०४.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- २७/०४/२०२६
तपासण्याची तारीख :- २७/०४/२०२६
सही केलेली तारीख :- २७/०४/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- २७/०४/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर

दिनांक-२७/०४/२०२६
स्थळ - शहापूर

एस.एस. काकडे
(लघुलेखिका नि.श्रे.)